पिंपरी १८, लेखा विभाग,
क्र. लेखा/३३/कावि/७०/२०१६,
दिनांक :- २५/०५/२०१६

**विषय :- VALUE ADDED TAX मासिक रिटर्न (नमुना J1 आणि J2) बाबत......**

**संदर्भ :- १) परिपत्रक क्र.लेखा/३३/कावि/१७५/१४ दि.२६/११/२०१४.**
**२) मे. सागर डुबे (C.A) यांचेकडील ई-मेल दि. २५/०५/२०१६**

**परिपत्रक,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विक्रीकर कार्यालयात मुंबई विक्रीकर अधिनियम १९५९ नुसार नोंदणी करण्यात आलेली आहे. तथापि, महाराष्ट्र शासनाने मुंबई विक्रीकर अधिनियम १९५९ चे विक्रीकर कायद्यात बदल करून त्याऐवजी महाराष्ट्र मुल्यवर्धित कर कायदा २००५ (महाराष्ट्र व्हॅल्यु अँडेड टॅक्स लेव्ही अँड अमेडमेंड अँक्ट २००५) हा दि.२९/०३/२००५ लागू केला असून त्याची अंमलबजावणी दि. १/४/२००५ पासून करण्यात आली आहे.

सदर मुल्यवर्धित कर कायदा २००५ हा मनपाला लागू आहे. त्यामुळे मुल्यवर्धित कराची मासिक रिटर्न भरणे मनपास बंधनकारक आहे. विक्रीकर विभागाकडील परिपत्रक क्रमांक ९टी (२५/०३/२०१४) नुसार मासिक रिटर्न भरणे आगोदर नमुना J१ आणि J२ भरणे बंधनकारक आहे. सदर नमुना J१ (विक्री) आणि J२ (खरेदी) यांची यांची मासिक रिटर्न भरणेकामी आपल्या विभागाची आवश्यक असलेली नमुना (J२) सर्व प्रकारच्या खरेदीची प्रलंबित माहिती संदर्भ क्रं.२ नुसार मनपाचे सी.ए. मे. सागर डुबे (मोबाईल - ८८८८८४४०६३ ई - मेल ca.sagar.dube@gmail.com, dube.s.sagar@gmail.com) यांना खाली दिलेल्या एक्सेल फोर्मेट मध्ये देणेत यावी.

| SR. NO | PARTY NAME | VAT TIN NUMBER | DISCRIPTION OF GOODS | GROSS AMOUNT | NET AMOUNT | VAT AMOUNT | RATE OF VAT % |
|---|---|---|---|---|---|---|---|

सदर माहिती खाली नमूद केलेल्या कालावधीनुसार स्वतंत्रपणे तयार करून पाठविण्यात यावी.

- महाराष्ट्र मुल्यवर्धित कर मासिक रिटर्न करावयाची आर्थिक वर्षे (J१ आणि J२ आभावी)

१) ऑक्टोबर २०१३ ते मार्च २०१४
२) एप्रिल २०१४ ते जून २०१४
३) जुलै २०१४ ते सप्टेंबर २०१४
४) ऑक्टोबर २०१४ ते डिसेंबर २०१४
५) जानेवारी २०१५ ते मार्च २०१५
६) एप्रिल २०१५ ते सप्टेंबर २०१५
७) ऑक्टोबर २०१५ ते मार्च २०१६
८) एप्रिल २०१६ ते आजपर्यंत

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियमांतील तरतुदीनुसार कोणत्याही प्रकारची खरेदीच्या बिलांमध्ये (VAT) ची योग्य टक्केवारी आणि रक्कम स्वतंत्रपणे दर्शविणे बंधनकारक आहे. सबब तशी माहिती सबंधित ठेकेदार / पुरवठाधारक यांनी बिलांमध्ये दाखविले नसल्यास ते बिल स्विकारण्यात येवू नये. याबाबत सबंधित अधिकारी /कर्मचारी यांनी शासकीय कायद्यांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. सबंधीत DDO नी याबाबत व्यक्तीश: लक्ष देवून शासकीय कर कायद्याचे पालन करावे.

तसेच महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायदा २००५ (VAT) नुसार सप्लायर बिले अदायगी करतेवेळी त्यांनी दिलेल्या मालाचे बिल हे (VAT) बिल आहे कि नाही याची खात्री करणे बंधनकारक आहे. तसेच सदर बिलामध्ये (VAT) हा योग्य टक्केवारीमध्ये दर्शविणे गरजेचे आहे. तसेच VAT TIN Number योग्य असल्याची खातरजमा http://mahavat.gov.in/Tin_Search/Tinsearch.jsp या संकेत स्थळावर केल्यानंतरच बिल ट्रेकिंग करतांना (VAT) रकमेची व VAT TIN Number ची स्वतंत्र नोंद संगणक प्रणालीमध्ये घेणेत यावी व त्यानंतरच लेखा विभागामध्ये बिले अदायगी कामी पाठवावीत. तरीही सदर कार्यपद्धती अवलंबीनेकामी काही अडचण असल्यास लेखा विभागाशी समक्ष संपर्क साधणेत येवून उपरोक्त नमूद माहिती लवकरात लवकर सादर करणेत यावी.

मुख्यलेखापाल
पिंपरीचिंचवडमहानगरपालिका
पिंपरी- १८

प्रति :- १) सर्व संबंधित विभाग प्रमुख
---------------------विभाग यांना कार्यवाही कामी अग्रेषित.

प्रत :- लेखाधिकारी
२) सदर परिपत्रकाची माहिती सर्व संबंधीतांना देणेत यावी.